क्र.२/नसाव/महासभा/ ०५ /२०१८-२०१९
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ३१ ऑगस्ट २०१८

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०१८-२०१९

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक १०/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

31.8
(के.सी.हळिंगळे)
**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०६/२०१८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.
४. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी पाच (५)नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणेसाठी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र.**
५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (२) अन्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील १६ सदस्यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१(अ) मधील तरतुदीनुसार नेमणूक करणेसाठी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र.**
६. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी प्रभाग समित्यांचे गठण करणेसाठी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र.**
७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० मधील तरतुदीनुसार विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीचे अधिनियमातील कलम ३१(अ) अन्वये गठण करणेसाठी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र.**
८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० मधील तरतुदीनुसार विशेष समिती अंतर्गत मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समितीचे अधिनियमातील कलम ३१(अ) अन्वये गठण करणेसाठी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र.**
९. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.
१०. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

31.8
(के.सी.हळिंगळे)
**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५**      दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ३९

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०६/२०१८ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ३१ ते ठराव क्र.३८ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्तातील ठराव क्र.३४ हा सर्वानुमते रद्द करणेत येत असून, उर्वरित कार्यवृत ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- Y. S Bagwan

अनुमोदक :- (मा. संगिता खरे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

१) ~~मा. महासभा लिपीक~~
२) ~~मा. उपमहापौर व्यवस्थापक~~

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ५०

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून, मा.महापौर आणि उपमहापौर यांची निवड करणेत आली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२, कलम ३ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महानगरपालिकेच्या लगतच येणाऱ्या महापालिकेच्या बैठकीत पाच व्यक्तींचे नामनिर्देशन नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून महानगरपालिका करील. यासाठी अधिनियमातील नियम ४ अन्वये नामनिर्देशित सदस्यांची अर्हता खालील प्रमाणे निश्चित करणेत आलेली आहे.

(क) राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्षे काम केलेली असेल, किंवा

(ख) किमान पाच वर्ष शिक्षणतज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यता प्राप्त शाळा किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता,मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

(ग) सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव धारण केलेली असेल, किंवा

(घ) कमीत कमी पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यता प्राप्त विद्यापीठची अभियांत्रिकी पदवीधारक असेल, किंवा

(ङ) राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरता अभिवक्ता किंवा मान्यता प्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवीधारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल, किंवा

(च) नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किंवा किमान दोन वर्षांचा अनुभव अलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

(छ) महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल.

नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना आयुक्त महानगरपालिकेतील सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि प्रत्येक गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करुन योग्य व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करणेसाठी शिफारस करतील. सदर तरतुदीनुसार महापालिकेतील गटनेत्यांशी विचारविनिमय करणेसाठी मा.आयुक्तसो यांचेशी झाले बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार आपआपल्या पक्ष / गटासाठी अनुज्ञेय संख्ये इतक्या व्यक्तींचे नामनिर्देशन सादर करणेसाठी सूचित करणेत आलेनुसार भारतीय जनता पार्टीचे गटनेते यांनी खालील तीन व्यक्तींचे नामनिर्देशन अर्हता दर्शविणाऱ्या कागदपत्रांसह दाखल केली आहेत.

... २ ...

१. इनामदार शेखर मधुकर

२. पाटील रणजितसिंह संभाजी

३. कांबळे विवेक आप्पा

तसेच, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीचे गटनेते यांनी खालील एक व्यक्तींचे नामनिर्देशन अर्हता दर्शविणाऱ्या कागदपत्रासह दाखल केले आहे.

१. मेस्त्री अब्दुलकरीम अल्लाबक्ष

तसेच, नॅशनलिस्ट कॉंग्रेस पक्ष (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) गटनेते यांनी खालील एक व्यक्तींचे नामनिर्देशन अर्हता दर्शविणाऱ्या कागदपत्रासह दाखल केले आहे.

१. बारगीर आयुब मुसा

वरील पाचही व्यक्ती महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ४(छ) अन्वये अर्हता धारण करीत असून, नामनिर्देशनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची संबंधीत विभागाकडून तपासणी करणेत आली आहे. उपरोक्त पाचही व्यक्ती सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून योग्य असल्याने नियुक्ती करणेकामी मा.आयुक्तसो यांनी केलेल्या शिफारशीनुसार खालील पाच व्यक्तींची नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. इनामदार शेखर मधुकर

२. पाटील रणजितसिंह संभाजी

३. कांबळे विवेक आप्पा

४. मेस्त्री अब्दुलकरीम अल्लाबक्ष

५. बारगीर आयुब मुसा

उपरोक्त नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणेत आली असून, त्याची नोंद घेवून प्रशासनाने योग्य ती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- Y. S. Bawadekar
(मा. युवराज बावडेकर)

अनुमोदक :- [signature]
(मा. धीरज सुर्यवंशी)

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

महासभा लिपीक

[signature]

नगरपालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ५१

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१८ नुकतीच पार पडली असून, नव्याने ७८ नवनिर्वाचित सदस्य निवडूण आले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(२) मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी प्रसिद्ध करणेत आलेल्या अध्यादेश व अधिसूचनेनुसार स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडील दि.२७ फेब्रुवारी २००७ अन्वये अधिनियमामध्ये सुधारणा करणेत आली असून, कोणत्याही समिती वरील पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना महानगरपालिका मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल अशी तरतुद करणेत आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मध्ये तरतुद असलेप्रमाणे मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करणेच्या प्रयोजनासाठी निवडणूक निकालाच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत मान्यता प्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे अथवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्रित येवून आघाडी व फ्रंट तयार करता येईल. या तरतुदीप्रमाणे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये निर्वाचित झालेल्या सदस्यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम १९८७ मधील नियम ४(१) अन्वये राजकीय पक्ष / आघाडीतील सदस्यांनी नमुना तीन मध्ये व्यक्तीगत माहिती भरुन सदरचे फॉर्मस् नियम ३(१) (अ) अन्वये संबंधीत पक्ष प्रमुखांचे मार्फत इकडे सादर करणेत आले असून, त्यानुसार महानगरपालिकेतील असलेल्या तौलनिक संख्याबळ भारतीय जनता पार्टीचे ०९, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षास -०४ आणि नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टीस -०३ असे एकुण १६ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणे आवश्यक आहे.

... २ ...

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१०/प्र.क्र.८५/नवि ३२ दि.०६ जुलै २०१० चे परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांवर सदस्य नामनिर्देशित करताना अनुसरावयाची कार्यपद्धी विषयी मार्गदर्शक सुचना प्रस्तावित करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीचे गटनेते, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे गटनेते आणि नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टीचे गटनेते यांनी अधिनियमातील कलम ३१(अ) मधील तरतुदीनुसार स्थायी समितीवर नामनिर्देशन करणेसाठी खालील प्रमाणे सदस्यांच्या नावाचे पत्र महापौर यांचेकडे सभेमध्ये देण्यात आली आहेत.

| | |
|---|---|
| १) पाटील अजिंक्य दिनकर | भारतीय जनता पार्टी |
| २) दिगडे भारती हेमंत | भारतीय जनता पार्टी |
| ३) नवलाई लक्ष्मण शिवराम | भारतीय जनता पार्टी |
| ४) शिंदे स्वाती नितीन | भारतीय जनता पार्टी |
| ५) कुलकर्णी संजय चंद्रकांत | भारतीय जनता पार्टी |
| ६) ढंग प्रकाश बाबासो | भारतीय जनता पार्टी |
| ७) आवटी संदिप सुरेश | भारतीय जनता पार्टी |
| ८) कोरे पांडूरंग मार्तंड | भारतीय जनता पार्टी |
| ९) माळी गणेश शिवाजी | भारतीय जनता पार्टी |
| १०) मेंढे संजय नायकू | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ११) निंबाळकर वर्षा अमर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १२) भोसले अभिजित दत्तात्रय | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १३) सरगर मनोज रघुनाथ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १४) काझी रजिया मंहमद | नॅशनॅलिस्ट कॉंगेस पार्टी |
| १५) माने विष्णू आण्णासाहेब | नॅशनॅलिस्ट कॉंगेस पार्टी |
| १६) थोरात योगेंद्र भगवान | नॅशनॅलिस्ट कॉंगेस पार्टी |

वरील प्रमाणे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ (सोळा) सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत असून, त्यानुसार प्रशासनाने नोंद घेवून, योग्य ती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- Y. S Bamwal (मा. युवराज बावडेकर)

अनुमोदक :- (मा. शेडजी कुर्णवरी)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

१) महासभा लिपीक
२) का-स्थायी समिती

नगरपालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ५२

विषय क्रमांक :- ०६

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये अस्तित्वात आली असून, महानगरपालिकेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू आहेत. त्यानुसार महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रथमपासून कलम २९-अ अन्वये प्रभाग समित्यांचे गठण करण्यात येवून, अधिनियमातील तरतुदीनुसार कामकाज चालविले जात आहे. तद्नंतर महानगरपालिकेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रभाग समित्यांचे गठण करण्यात आलेले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची पाचवी सार्वत्रिक निवडणूक २०१८ नुकतीच पार पडली असून, निवडणूक कामकाजासाठी सौकार्याच्या दृष्टीने निवडणूक निर्णय अधिकारी निहाय प्रभाग खालील प्रमाणे निश्चित करणेत येवून, एकूण २० प्रभागातून ७८ सदस्य निर्वाचित झालेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा कलम २९-अ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका ठरविल अशा लागू असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करणेत येईल. तसेच, ३ लाखापेक्षा अधिक व ४.५० लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी - किमान तीन व कमाल चार आणि ४.५ लाखापेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी - किमान चार व कमाल नऊ अशी तरतुद आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सन २०११ चे जनगणनेनुसार ५,०२,७९३ इतकी लोकसंख्या असलेने, त्यानुसार अधिनियमातील तरतुद विचारात घेवून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी प्रभाग समित्यांचे गठण करताना प्रभागाची भौगोलिक स्थिती व संलग्नता विचारात घेवून महानगरपालिका क्षेत्रासाठी खालील प्रमाणे चार प्रभाग समित्यांचे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती क्रमांक - एक | ११,१२,१३,१४,१६ |
| २. | प्रभाग समिती क्रमांक - दोन | १०,१५,१७,१८,१९ |
| ३. | प्रभाग समिती क्रमांक - तीन | १,२,८,९ |
| ४. | प्रभाग समिती क्रमांक - चार | ३,४,५,६,७,२० |

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S. Bawww (मा. युवराज बावडेकर)

अनुमोदक :- (मा. धीरज सुर्यवंशी)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगरसचिव,
मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ५३

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासनाने महिलांना केंद्रस्थानी महापालिका क्षेत्रातील महिलांचा सहभाग त्यांना संरक्षण, महिलांची आर्थिक उन्नत्ती आणि त्यांच्या क्षमतेचे संवर्धन तसेच त्यांना अनुकूल वातावरण निर्मिती यासाठी नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना सक्षम करणेसाठी महिला व बालकल्याण समिती स्थापन करणेबाबत निर्देश आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक - २०१८ नुकतीच पार पडलेली आहे. सदर निवडणुकीमध्ये ३९ महिला सदस्य निर्वाचित झालेल्या आहेत. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निर्वाचित झालेल्या महिला सदस्या मधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० महानगरपालिकेच्या विशेष समित्या मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक आहे. "महिला व बालकल्याण समिती वरील सदस्या पैकी किमान ७५% सदस्य हे महिला पालिका सदस्यापैकी असतील अशी तरतुद आहे." त्यानुसार महिला व बालकल्याण समितीसाठी एकूण निर्वाचित ३९ महिला सदस्यांमधून सदस्य संख्या १६ इतकी निश्चित करुन, अधिनियमातील कलम ३१-अ मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीचे खालील प्रमाणे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुरणे अनारकली जमीर (भाजपा) | ९. | सलगर अस्मिता संदीप (भाजपा) |
| २. | राऊत सुनंदा चद्रकांत (भाजपा) | १०. | पाटील रोहिणी सत्यजीत (भा.रा.कॉं.) |
| ३. | सुतार गीता सुयोग (भाजपा) | ११. | वळवडे आरती रविंद्र (भा.रा.कॉं.) |
| ४. | सुर्यवंशी गीतांजली वसंत (भाजपा) | १२. | बारुदवाले मदिना इलाई (भा.रा.कॉं.) |
| ५. | नाईक नसिमा गैबीसाहेब (भाजपा) | १३. | साळूंखे शुभांगी महेश (भा.रा.कॉं.) |
| ६. | जाधव शांता रघुनाथ (भाजपा) | १४. | पारधी स्वाती सुरेश (नॅश.कॉं.) |
| ७. | ठाणेदार मोहना वासुदेव (भाजपा) | १५. | मोहिते सविता शेडजी (नॅश.कॉं.) |
| ८. | कुल्लोळी गायत्री गजेंद्र (भाजपा) | १६. | केरीपाळे पवित्रा विजयकुमार (नॅश.कॉं.) |

१) महासभा लिपीक
२) सम्बन्ध अधिकारी.

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सुचक :- Y. S Bawane (मा.युवराज बावडेकर) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा-धीरज सुर्यवंशी)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०९/२०१८

ठराव क्रमांक :- ५४

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या मागासवर्गीय विशेष घटकातील लोकांच्या कल्याणासाठी तसेच त्यांचे राहणीमान उज्वल करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वेळोवेळी राबविल्या जात आहेत. महापालिका क्षेत्रातील मागासवर्गीय नागरिकांचे राहणीमान सुधारणेसाठी रस्ते, गटारी, शौचालय, कुपनलिका इत्यादी आवश्यक त्या सुविधा महानगरपालिकेमार्फत पुरविल्या जात आहेत. यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती गठीत केली जाते व मागासवर्गीय वसाहतींचा विकास करणेसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये एकूण महसुली उत्पन्नाच्या ५% निधी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पामध्ये राखून ठेवला जातो. सदर निधीतून अनुसूचित जाती-जमाती,विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांचेसाठी कल्याणकारी योजनेवर व सोई सुविधांवर खर्च केला जातो.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक - २०१८ नुकतीच पार पडलेली आहे. सदर निवडणुकी मध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गातून एकूण ११ सदस्य निर्वाचित झालेले आहेत. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी मध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गातून निर्वाचित झालेल्या सदस्या मधून सदस्य संख्या निश्चित करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० महानगरपालिकेच्या विशेष समित्या मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेल्या सूचनेवरुन मागासवर्गीय व दलित वस्ती सुधार समिती ऐवजी समाज कल्याण समिती चे गठण करणे आवश्यक असल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी समाज कल्याण समितीचे गठण करणेसाठी अनुसूचित जाती या प्रवर्गातून सर्व निर्वाचित ११ सदस्यांची समाज कल्याण समितीचे खालील प्रमाणे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. मोहिते शेडजी सुबराव
२. मोहिते सविता शेडजी
३. वनखंडे अनिता मोहन
४. देवमाने आनंदा मारुती
५. सागरे सोनाली विलास
६. ठोकळे जगन्नाथ बापू
७. कांबळे कांचन युवराज
८. मद्रासी सुब्राव नागाप्पा
९. सांवत स्नेहल सचिन
१०. वायदंडे अप्सरा महेंद्र
११. थोरात योगेंद्र भगवान

१) महासभा लिपीक
२) नगरसचिव

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सुचक :- Y. S. Bamore (मा. युवराज बामणे)

अनुमोदक :- (मा. धीरज सूर्यवंशी)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका